# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

### विद्यार्थी कल्याण मंडळ



पुढारी | पुणे, शनिवार १७ फेब्रुवारी २०१८

# आवड आणि व्यवसाय यांची सांगड घाला

## प्रा. मुबीन तांबोळी यांचा सल्ला

राजगुरुनगर : प्रतिनिधी

प्रा. मुबीन तांबोळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना.



लोकमत पुणे, शनिवार, दि. १७ फेब्रुवारी २०१८

# आवडीच्या क्षेत्रात करिअर निवडा

लोकमत न्यूज नेटवर्क

प्राध्यापक मुबीन तांबोळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना.

केसरी पुणे, १९ फेब्रुवारी २०१८

# आवड आणि व्यवसाय यांची सांगड घाला : प्रा. मुबीन तांबोळी

राजगुरुनगर, (वार्ताहर) : विद्यार्थ्यांनी शिक्षण घेताना स्वतःच्या क्षमता, वेगळेपणा ओळखून आत्मविश्वासाने आवडीच्याच क्षेत्रात करिअर करायला हवे, कारण ज्याची आवड आणि व्यवसाय एकच असतो तोच खऱ्या अर्थाने सुखी होतो असे प्रतिपादन कौशल्य विकास मार्गदर्शक प्रा. मुबीन तांबोळी यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित कौशल्य विकास कार्यक्रमात स्वयंओळख व निर्णयक्षमता या विषयावर ते बोलत होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी



येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित कौशल्य विकास कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. मुबीन तांबोळी.

उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा.व्ही. डी. कुलकर्णी, डॉ.संजय शिंदे, सर्व प्राध्यापक उपस्थित होते. महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील सुमारे १६५ विद्यार्थ्यांनी १० दिवसांच्या या कौशल्य विकास कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

तांबोळी पुढे म्हणाले, स्वतःवर विश्वास ठेवा. स्वतःचा शोध घ्या. चेहऱ्यावरील सौंदर्यापेक्षा मनाला महत्व द्या. आयुष्यात फक्त एकच यश नसते तर जे मनासारखे चांगल घडते ते यशच असून त्याचा उपभोग घ्या. स्वतःचे काम पूर्ण क्षमतेने करा. प्राधान्यक्रम ठरवा. मळलेल्या वाटेने न जाता स्वतःची वेगळी वाट शोधा. माझी प्रगती झाली तरच माझ्या देशाची प्रगती होईल हे सूत्र ध्यानात ठेऊन प्रामाणिकपणे काम करा असे आवाहन त्यांनी केले.

या कौशल्य विकास कार्यक्रमात विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे महत्व, यशाचे रहस्य, सकारात्मक दृष्टिकोन, वेळेचे व्यवस्थापन, व्यक्तिमत्व विकास, ध्येयनिश्चिती, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, भाषण-लेखन-संभाषण-श्रवण कौशल्य, मुलाखतीची तयारी, गटचर्चा, रोजगार मार्गदर्शन, स्वयं ओळख आदि विषयांवर शिक्षकांनी यांनी मार्गदर्शन केले. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील आणि समन्वयक प्रा.संदीप थोरात यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख